ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134, Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १ जुलै, १९६४ | अंक १३

## विविध माहिती

**पं. नेहरूंच्या पुस्तकांना मागणी**—लंडनमध्यें जगांतील पुस्तकांचें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत पं. नेहरू ह्यांनीं लिहिलेल्या आणि त्यांच्याविषयीं लिहिण्यांत आलेल्या पुस्तकांचा एक स्वतंत्र विभागच मांडण्यांत आला असून हीं सर्वच पुस्तकें झपाट्यानें खपत आहेत. पुस्तकें विकणाऱ्या कंपनी-कडे जगांतील अनेक देशांच्या वाचकांकडून मागण्या येत आहेत. त्यांत आफ्रिकेंतील कांहीं देशांच्या मागण्या आघाडीवर आहेत.

**रंगाची निर्यात**—पश्चिम आशिआ आणि पूर्व आफ्रिका ह्या भागांत भारताच्या रंगाला बाजारपेठ मिळविण्याचे प्रयत्न चालू होते. ह्या भागांत दौऱ्यावर गेलेल्या रंगधंद्याच्या प्रतिनिधी-मंडळानें सुमारें २·५ लाख रुपयांच्या रंगाच्या मागण्या मिळविल्या आहेत. आणखी ५-६ लाखांच्या मागण्या मिळण्यासारख्या आहेत.

**आयुर्वेदीय ग्रंथांचें संशोधन**—प्राचीन आयुर्वेदीय ग्रंथ शोधून काढून त्यांच्या अभ्यासनीय प्रती तयार करण्यासाठी एक कमिटी स्थापन करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. ही कमिटी बहुधा झांशी येथें स्थापन करण्यांत येईल. आयुर्वेदीय ग्रंथ बहुधा पोथ्यांच्या आणि ताडपत्रांच्या स्वरूपांत सांपडतात. पुराणांत अनेक आयुर्वेदीय ग्रंथांचा उल्लेख आलेला आहे. हे ग्रंथहि हुडकून काढण्याचें काम कमिटी करणार आहे.

**पाकिस्तानला रशिआचें कर्ज**—रशिआ आणि पाकिस्तान ह्यांच्यांत अल्प मुदतीच्या कर्जासंबंधीं करार करण्यांत आला आहे. कराराला अनुसरून रशिआ पाकिस्तानला पाच कोटी रुपये कर्जाऊ देणार आहे. त्याचा उपयोग शेतीची यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी पाकिस्तानने करावयाचा आहे. कर्जाची मुदत ५ वर्षांची आहे व व्याजाचा दर ३ टक्के आहे.

**ब्रिटन-झेक व्यापारी करार**—पूर्व युरोपांतील कम्युनिस्ट मतप्रणालीचे देश आणि पश्चिम युरोपांतील देश ह्यांच्यांत अधिक घनिष्ठ व्यापारी संबंध प्रस्थापित होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. ब्रिटननें झेकोस्लोव्हाकिआला एक खताचा कारखाना पुरविण्याचें कबूल केलें असून त्यासाठी ४० लाख पौंडांचें कर्जहि देण्याचें मान्य केलें आहे. कर्जाची मुदत १२ वर्षांची आहे.

**काथ्याच्या मालासाठी यंत्रसामग्री**—केरळमधील काथ्या-च्या चटया तयार करण्याच्या उद्योगधंद्यांत यंत्रसामग्रीचा उपयोग करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. प्रथम सुमारें एक वृतिआंश कारखान्यांत ती बसविण्यांत येईल. कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री पश्चिम जर्मनींतून आयात करण्यांत येणार आहे.

**रशियांत भारतीय भाषांचें शिक्षण**—रशिआंतील १०-१२ माध्यमिक शाळांतून हिंदी, उर्दू व बंगाली भाषांपैकी एक कोणती तरी भाषा सक्तीनें शिकविण्यांत येते. ह्या शाळा अर्थातच रशिआं-तील मोठ्या शहरांतील आहेत. रशिआंत २०० विद्यार्थी मराठीहि शिकत आहेत. भारतांतील भाषांतून रेडिओवरून कार्यक्रम प्रक्षेपित करण्याची तयारीहि चालू आहे. लवकरच गुजराती भाषेंतील कार्यक्रम सुरू होणार आहेत.

**ब्रिटनकडून लष्करासाठी मदत**—भारताच्या लष्करासाठी ब्रिटनकडून लवकरच ४५ लाख पौंड किंमतीची सामग्री मिळणार आहे. ह्या मदतीचा तपशील ठरविण्यासाठी भारताच्या लष्करी अधिकाऱ्यांची एक तुकडी ब्रिटनला जाण्याचा संभव आहे. तथापि बंदुका, विमानांना लागणारे सुटे भाग, इलेक्ट्रिक उपकरणें, इत्या-दींचा समावेश मदतींत खासच असेल.

**दाढींच्या पात्यांची निर्यात**—हिंदमध्यें तयार करण्यांत आलेलीं दाढीचीं पातीं आणि वस्तरे परदेशांत लोकप्रिय होत आहेत. ह्या मालाला बेल्जममध्यें विशेष वाव आहे. कारण बेल्जम-मध्यें ह्या वस्तू तयार करणारा एकच कारखाना आहे. त्यामुळें तेथील गरज त्याला एकट्याला भागवितां येत नाहीं. परिणामीं बेल्जमला ब्रिटन आणि पश्चिम जर्मनीकडून ह्या वस्तू आयात कराव्या लागतात.

**हृदयविकाराला पडणारे बळी**—संयुक्तराष्ट्र संघटनेच्या जागतिक संघटनेनें केलेल्या पहाणीवरून असें दिसून आलें आहे कीं, ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिआ, न्यूझीलंड, आदीकरून देशांत घडणाऱ्या मृत्यूंपैकी अर्ध्यापेक्षा अधिक मृत्यु हृदयविकारानें होतात. आरोग्यसंघटनेनें २२ निवडक देशांतून ह्या रोगाविषयीं पहाणी केलेली होती.

**मलायांतील हिंदू देवळें**—सिंगापूरमधील दोन प्राचीन हिंदू देवळांचा जीर्णोद्धार करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. ह्या कामासाठी ३ लाख, ८५ हजार डॉलर्स खर्च येणार आहे. देवळांना लागणाऱ्या अनेक प्रकारच्या वस्तू भारतांतून मागविण्यांत आल्या आहेत. परंतु त्या वेळेवर हातीं न आल्यानें कामास विलंब लागत आहे.

**नगरपालिकेचें चित्रगृह**—सालेम नगरपालिकेनें आपल्या मालकीचें एक चित्रगृह बांधण्याची योजना तयार केली असून ती सरकारकडे मंजुरीसाठी धाडली आहे. संकल्पित चित्रगृहासाठी ४·५ लाख रुपये खर्च येणार असून तो करमणुकीवरील कराच्या पैशांतून उभारण्याची व्यवस्था नगरपालिका करणार आहे.

## नेहरूंच्या कारकीर्दीमधील आर्थिक प्रगति

| | १९४८–४९ | १९६२–६३ |
|---|---|---|
| राष्ट्रीय उत्पन्न (कोटी रु.) | ८,६५० | १३,३५० |
| दर माणशीं उत्पन्न (रु.) | २४९.६ | २९४.२ |
| शेतीचें उत्पादन :— | | |
| तांदूळ (दशलक्ष टन) | १९.२७ | ५२.०३ |
| गहूं ,, | ५.२६ | ११.१३ |
| इतर द्विदल ,, | १२.६५ | २३.९४ |
| धान्यें ,, | ३.८१ | ५.७३ |
| ताग (दशलक्ष गांठी) | १.९८ | ५.३७ |
| कपास ,, | २.१२ | ५.३१ |
| साखर (गुळासह) (दशलक्ष टन) | ३.८१ | ९.३७ |
| औद्योगिक उत्पादन :— | | |
| पोलाद (दशलक्ष टन) | ०.८४ | ४.०० |
| सिमेंट ,, | १.५० | ८.९० |
| सल्फ्यूरिक ॲसिड (हजार टन) | ०.८० | ४.८३ |
| कपास सूत (दशलक्ष कि. ग्रॅ.) | ६४३ | ८५७ |
| कपास कापड ,, | ३,९५१ | ६,९२८ |
| तागाचा पक्का माल (हजार टन) | १,०८८ | १,२०२ |
| जळण व इंधन :— | | |
| कोळसा (दशलक्ष टन) | २९.८ | ६३.८ |
| वीज (दशलक्ष कि. वॅट) | ४,५७५ | २२,१०० |
| आयात (कोटी रु.) | ५१८ | १,०८९ |
| निर्गत (कोटी रु.) | ४२२.८ | ९८२.२ |

### बिहार राज्यांतील मच्छीमारीचा धंदा

हिंदमधील अन्नधान्याची टंचाई अजून बराच काळ चालू राहणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. ह्या टंचाईला तोंड देण्यासाठी सुचविण्यांत येणाऱ्या अनेक उपायांत खाण्याच्या संवयी बदलण्याचा उपायहि सुचविण्यांत येतो. देशांतील माशांचें उत्पादन वाढवून खाद्यपदार्थांत त्यांचा अधिक प्रमाणांत अंतर्भाव करण्यांत आला तर धान्याच्या मागणीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. ह्या दृष्टीनें माशांची पैदास वाढविण्यासाठी बिहार सरकारनें प्रयत्न चालविले आहेत. मच्छीमारीच्या धंद्यासाठी एक स्वतंत्र खातेंच काढून राज्यांतील माशांची पैदास ५ पटीनें वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. बिहारमध्यें ५ लाख एकर क्षेत्रफळाच्या पाण्यावर मच्छीमारीचा धंदा करण्यांत येतो. त्याशिवाय नदीकांठच्या १ हजार मैलांतहि हा धंदा चालू आहे. माशांची उत्पत्ति जलद व्हावी म्हणून कांहीं विशिष्ट प्रकारचे मासे परदेशांतून आणून बिहारमधील तळ्यांतून व सरोवरांतून सोडण्यांत आलेले आहेत. हा धंदा करणाऱ्या २०० सहकारी संस्था असून त्यांना माशांच्या पैदाशीसाठी उत्तेजन देण्यांत येत आहे. सध्यां बिहारमध्यें दरसाल सुमारें ४० हजार टन मासे पकडण्यांत येतात व त्यांपैकी जवळजवळ निम्मे पश्चिम बंगालमध्यें पाठविण्यांत येतात. माशांचें उत्पादन वाढविण्यास यश आलें तरी त्याच्या खपाची ग्वाही देतां येणें कठीण आहे. कारण, लोकांच्या आहाराच्या संवयी सहजासहजीं बदलता येत नाहींत. अन्नधान्यांच्या आवडीनिवडींतहि प्रांताप्रांतांत अनेक भेद असतात. ते मिटवून आहारांत जरूरीप्रमाणें बदल करता येणेंहि अवघड जातें; मग शाकाहारापासून मांसाहारापर्यंत मजल मारणें तर त्याहूनहि अवघड वाटल्यास नवल नाहीं.


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ – पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

चालू ठेव ... ... १½ टक्के
सेव्हिंग्ज ... ... ३ टक्के

**कायम ठेव–**

१ महिना ... ... २.३७ टक्के
३ महिने ... ... ३.५० टक्के
६ महिने ... ... ३.७५ टक्के
१ वर्ष ... ... ४ टक्के
२ वर्षें ... ... ४.२५ टक्के
३ वर्षांचे वर ... ... ४.५० टक्के

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

: मुख्य कचेरी :
९, बेंक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईंतील शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल ... ४ कोटी ७५ लाख
गंगाजळी व फंड ... १ कोटी ४१ लाख
ठेवी ... २९ कोटी ६३ लाख
खेळतें भांडवल ... ६७ कोटी ८७ लाख

**महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

**संरक्षण निधीच्या रकमा या बँकेंत स्वीकारल्या जातात.**

# अर्थ

बुधवार, १ जुलै, १९६४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सिमेंटचें उत्पादन करण्याची यंत्रसामग्री

औद्योगीकरणाचें धोरण स्वीकारलेल्या देशांत बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर सिमेंटची जरुरी लागते. तीन पंचवार्षिक कार्यक्रम पुरे होत आले असतांनाहि भारतांत अजून सिमेंटचें उत्पादन पुरेसें होत नाहीं. सिमेंटच्या उद्योगधंद्याचा दिल्ली येथें नियोजन-समिती आणि उद्योगखातें ह्यांनीं घेतलेल्या आढाव्यावरून हेंच दिसून आलें. देशांतील सिमेंटचें उत्पादन वाढविण्यासाठी सिमेंटचे निदान पांच संपूर्ण कारखाने आयात करण्यांत आले पाहिजेत असें आढळून आलें आहे. सिमेंटच्या उद्योगधंद्यांतील सध्याची गति चालू ठेवण्यासाठी ह्या संकल्पित आयातीचा उपयोग झाला तरी त्यामुळें ह्या उद्योगधंद्याचा विकास होण्यास फारशी मदत होणार नाहीं. त्यासाठी सिमेंटच्या कारखान्यांची यंत्रसामग्री देशांतच बनविणें अत्यंत जरूर असून त्या दृष्टीनें ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील गरजांची पहाणी करण्यांत येणार आहे. भारतांत यंत्रसामग्री बनविणारे कारखाने असले तरी त्यांत अनेक प्रकारची यंत्रसामग्री बनविण्यांत येते. उदाहरणार्थ सिमेंट, कागद, साखर, इत्यादींच्या कारखान्यांची यंत्रसामग्री एकाच कारखान्यांत बनविली जाते. एकाच वेळीं अनेक प्रकारच्या कारखान्यांची यंत्रसामग्री बनविणें ह्यापुढें अवघड होत जाणार असल्याचें तज्ज्ञांचें मत आहे. शिवाय, देशांत बनविलेल्या सिमेंटच्या कारखान्यांच्या यंत्रसामग्रीच्या किंमतीचाहि प्रश्न आहे. सध्यां तरी ह्या किंमती फार चढ्या आहेत. ज्या ठिकाणीं चुनखडीचा दगड पुरेशा प्रमाणांत उपलब्ध आहे त्या ठिकाणीं ४ लाख टन वार्षिक उत्पादनक्षमतेचे कारखाने आणि इतर ठिकाणीं लहान कारखाने काढण्यांत यावे असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

## लाखेच्या निर्यातीचें भवितव्य अनिश्चित

भारतांत तयार करण्यांत येणाऱ्या लाखेची परदेशांत निर्यात करण्यांत येते. जपान हा देश भारताकडून लाखेची बरीच आयात करतो. तथापि गेल्या कांहीं महिन्यांत जपानमध्यें लाखेची मागणी कमी होऊं लागली आहे. लाख हा पदार्थ औद्योगिक उपयोगाचा असून त्याचा अनेक धंद्यांत वापर करण्यांत येतो. जपानमध्यें लाकडी फर्निचर तयार झाल्यावर त्याला पॉलिश करण्यासाठी लाखेपासून तयार केलेलें रसायन वापरण्यांत येतें. अलीकडे जपानमध्यें लाकडाच्या ऐवजीं पोलादाचें फर्निचर अधिक प्रमाणांत करण्यांत येऊं लागलें आहे. त्यामुळें लाखेची मागणी कमी होऊं लागली आहे. लाकूडकाम करणाऱ्या उद्योगधंद्यासाठी जपानला लाखेची गरज लागते. तरीसुद्धां जपानची जास्तींत जास्त मागणी दरसाल २,००० टनांपेक्षा अधिक असणार नाहीं असा अंदाज करण्यांत आला आहे. भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या लाखेपैकी ७५ टक्के लाख लाकूडकामाच्या धंद्यांतच वापरण्यांत येते. अलीकडे कांहीं देशांत कृत्रिम लाखहि तयार करण्यांत येऊं लागली आहे. त्याशिवाय सयामसारख्या कांहीं देशांतून कमी प्रतीची लाखहि पैदा होऊं लागली आहे. तरीसुद्धां जपानमधील लाख वापरणारे उद्योगधंदे भारताच्या लाखेलाच अजून प्राधान्य देत आहेत. परंतु जपानची लाखेची मागणी कायम टिकविण्यासाठी भारताच्या लाखेच्या दर्जांत सुधारणा करण्यांत आली पाहिजे. त्याचप्रमाणें ती अधिक चांगल्या पॅकिंगमधून पाठविण्यांत आली पाहिजे. शिवाय लाखेच्या किंमतीहि स्पर्धेला टिकतील अशा पातळीवर राखण्याची आवश्यकता आहे.

## बिर्लांच्या कारखान्याला अमेरिकेची मदत

सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला सध्यां अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. भारतामधील उद्योगधंद्यांना अमेरिकेकडून मदत मिळविण्याचे प्रयत्न ते करीत असून त्यांना कांहीं प्रमाणांत यशहि आलें आहे. हिंदुस्थान अल्युमिनम कॉर्पोरेशन ह्या कारखान्याचा विस्तार करण्याची योजना आखण्यांत आली असून त्यासाठी लागणाऱ्या अमेरिकन मदतीबद्दलच्या वाटाघाटी त्यांनीं जवळजवळ पुऱ्या केल्या आहेत. ह्या कारखान्याची सध्यांची उत्पादनक्षमता दरसाल २३ हजार टनांची आहे. ती वाढवून ६० हजार टनांची करण्यासाठी कारखान्याचा विस्तार करण्यांत यावयाचा आहे. परंतु हा विस्तार करण्यापूर्वी कारखान्याला लागणारी वीज स्वतंत्रपणें मिळण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. अल्युमिनमच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी लागणारा पैसा एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकतर्फे पुरविण्यांत येणार आहे. वीजगृहाच्या उभारणीसाठी लागणारें परदेशीय चलन वीजगृह पुरविणारी कंपनीच देणार असून ह्या कामासाठी लागणारा रुपयांतील खर्च आंतरराष्ट्रीय-विकास-एजन्सी देणार आहे. अल्युमिनमच्या कारखान्याचा विस्तार दोन टप्प्यांत पुरा करण्यांत येणार आहे. १९६५ च्या अखेरीस पहिला टप्पा पुरा होईल आणि मग दरसाल ४८ हजार टन उत्पादन होऊं लागेल. १९६६ अखेर दुसरा टप्पा पुरा करण्यांत येईल आणि दरसाल ६० हजार टनाचें उद्दिष्ट गांठलें जाईल. पिलानी येथील एंजिनिअरिंग संस्थेची पुनर्घटना अमेरिकेंतील मॅसॅच्युसेटस् एंजिनिअरिंग संस्थेच्या धर्तीवर करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी १ कोटी रुपये लागणार असून ती मदत अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशन करणार आहे. त्याशिवाय ६ अमेरिकन प्राध्यापक आणि संस्थेला लागणारें साहित्यहि फौंडेशन पुरविण्यास तयार आहे.

## श्री. दास ह्यांनीं अहवाल स्वतःच्या हातानें लिहिला

दास कमिशनचा ४७० फुलस्केप कागदांचा सबंध अहवाल श्री. एस. आर. दास ह्यांनीं स्वतःच्या हातानें लिहून काढला आणि तो पंतप्रधानांना सादर करण्याच्या वेळीं टाइप करवून घेतला. अहवालाची गुप्तता राखण्यासाठी श्री. दास ह्यांनीं एवढी दक्षता घेतली.

### बँकांचा अंडररायटिंगचा व्यवहार

जॉईंट स्टॉक कंपन्यांचे शेअर्स आणि डिबेंचर्स अंडरराइट करण्याचा बँकांचा व्यवहार वाढत्या प्रमाणावर आहे. रिझर्व्ह बँकेनें त्याबाबत पहाणी करतांना बँकांकडून (१) अंडरराइट केलेली रक्कम, (२) लोकांनीं खरेदी न केल्यामुळें बँकेला घ्याव्या लागलेल्या शेअर्स–डिबेंचर्सची रक्कम आणि (३) त्यानंतर विक्री करून आलेली रक्कम, ह्याविषयीं तपशील मागविला होता.

जानेवारी, १९५६ ते जून, १९६२ ह्या मुदतींत बँकांनीं एकूण २१·३ कोटी रु. चे शेअर्स आणि डिबेंचर्स अंडरराइट केली. विक्रीस काढलेल्या आणि ज्यांच्या अंडररायटिंगमध्यें बँकांनीं भाग घेतला अशा शेअर्स-डिबेंचर्सचा हा ३०% भाग होता. १९५७ सालीं ४१ लक्ष रु. च्या अंडररायटिंगचा व्यवहार झाला, तो १९६० मध्यें ७·२० कोटी रु. वर गेला पण १९६१ मध्यें २·६९ कोटी रु. वर उतरला. विक्रीस काढलेल्या शेअर्स-डिबेंचर्सशीं अंडरराइट केलेल्या रकमेचें प्रमाण १९५९ मध्यें ४७% होतें, तें १९६२ मध्यें १६% वर आलें. जानेवारी, १९५६ ते जून, १९६२ ह्या मुदतीमधील अंडररायटिंगपैकी ४३% ऑर्डिनरी भागांचें होतें, ३२% डिबेंचर्सचें होतें आणि २५% प्रेफरन्स भागांचें होतें.

५० कोटी रुपयांपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या बँकांनीं एकूण अंडररायटिंगपैकीं ७६% अंडररायटिंग केलें. २५ कोटी रुपयांपेक्षा कमी ठेवी असणाऱ्या बँकांनीं फक्त ५% अंडररायटिंग केलें. विदेशी बँकांनीं हा व्यवहारच केला नाहीं.

२१·३ कोटी रुपयांचें एकूण अंडररायटिंग करण्यांत आलें, त्यांपैकीं ५·४ कोटी रुपयांचे शेअर्स व डिबेंचर्स बँकांनाच खरीदावे लागले. त्यांपैकी १·५ कोटी रुपयांचे शेअर्स व डिबेंचर्स त्या विकूं शकल्या; बाकीचे त्यांच्याच अंगावर पडले. सप्टेंबर, १९६२ अखेरच्या आकड्यांप्रमाणें, बँकांनीं अंडरराइट केलेल्यांपैकी ३·९ कोटी रु. चे म्हणजे एकूणच्या १८% शेअर्स व डिबेंचर्स त्यांच्याच इन्व्हेस्टमेंटखातीं शिल्लक आहेत.

अंडररायटिंग कमिशनचा दर ½% ते ३% होता. प्रेफरन्स शेअर्सच्या अंडररायटिंगचा दर सर्वांत जास्त होता; तो सरासरीनें १·७५% पडला. ऑर्डिनरी शेअर्सच्या अंडररायटिंगच्या दराची सरासरी १·६६% आणि डिबेंचर्सच्या अंडररायटिंगच्या दराची सरासरी १·१४% पडली.

**बँकांचें अंडररायटिंग कमिशन (लक्ष रु.)**

| कमिशनचा दर | ऑर्डिनरी भाग | प्रेफरन्स भाग | डिबेंचर्स | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०—०·५० % | २१ | — | १,१९ | १,७० |
| ०·५१—१·०० % | २,२८ | ९० | २,६० | ५,७८ |
| १·०१—२·०० % | २,७० | २·२८ | २,३२ | ७,३० |
| २·०१—३·०९ % | ३,८१ | १·९३ | ४८ | ६,२२ |
| ३·०० % च्या वर | — | — | ३१ | ३१ |
| एकूण | ९,३१ | ५·१० | ६,९० | २१,३१ |
| सरासरी दर | १·६६ | १·७५ | १·१४ | १·५० |

**बँकांचा अंडररायटिंगचा व्यवहार—जानेवारी, १९५६ ते जून १९६२**

(आंकडे लक्ष रुपयांचे)

| | विक्रीस काढलेले * | | | | बँकांनीं अंडरराइट केलेले | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऑर्डिनरी भाग (१) | प्रेफरन्स भाग (२) | डिबेंचर्स (३) | एकूण (४) | ऑर्डिनरी भाग (५) | प्रेफरन्स भाग (६) | डिबेंचर्स (७) | एकूण (८) | (८) चे (४) शीं प्रमाण % |
| १९५६ ... | ७६ | २,२७ | ९० | ३,९३ | ३९ | ५८ | ५५ | १,५२ | ३८·७ |
| १९५७ ... | २,१० | — | १,०० | ३,१० | ३८ | — | ३ | ४१ | १३·२ |
| १९५८ ... | ४६ | १,३८ | ३,६३ | ५,४७ | ५ | ५९ | ६७ | १,३१ | २३·९ |
| १९५९ ... | २,८३ | ३,८५ | ५,५५ | १२,२३ | ४१ | २,३७ | ३,०१ | ५,७९ | ४७·३ |
| १९६० ... | १२,१९ | २,७२ | ५,२५ | २०,१६ | ४,११ | १,४९ | १,६० | ७,२० | ३५·७ |
| १९६१ ... | ७,७९ | १७ | ४,१५ | १२,११ | २,१७ | ७ | ४५ | २,६९ | २२·२ |
| जाने.—जून १९६२ | ८,४३ | — | ६,२० | १४,६३ | ८० | — | ५९ | २,३९ | १६·३ |
| एकूण | ३४,५६ | १०,३९ | २६,६८ | ७१,६३ | ९,३१ | ५,१० | ६,९० | २१,३१ | २९.८ |

* ज्यांचे संबंधांत बँकांनीं अंडररायटिंगची हमी घेतली.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

यांचा आलटून पालटून उपयोग करता येतो. त्यामुळें चराऊ रानांत जनावरांचें पडलेलें शेण व मूत्र रानास स्वताप्रमाणें मिळतें व त्यामुळें चरण्यास व कापण्यास भरपूर गवत मिळूं शकतें. चांगल्या जातीच्या सकस गवताशिवाय दुभत्या जनावरांस थोडा हिरवा चारा किंवा वैरण मिळाल्यास जनावरांची प्रकृति चांगली राहून दुधाचा प्रवाहहि वाढतो.

वरीलप्रमाणें दुधदुभत्या जनावरांची व्यवस्था ठेवल्यानें दुग्धदायितेंत वाढ होण्यास खूपच मदत होते. पाश्चात्त्य देशांतील गाई आपल्याकडील दुभत्या जनावराच्या चौपट तें सातपट दूध देतात याचीं कारणें वरील प्रकारच्या व्यवस्थेंतच असतात.

आपल्या देशामध्यें आतां प्रत्येक खेडेगांवांत ग्रामपंचायती सुरू झालेल्या आहेत. तेव्हां ग्रामपंचायतीच्या कार्यांत चराऊ रानांची सुधारणा व दुभत्या जनावरांची सोय करणें याहि कार्याचा समावेश होण्याची जरूरी आहे. शेती सुधारण्याच्या कार्यांत शेतीस जोडधंदा या दृष्टीनें दूधउत्पादनाची वाढ करणें, हें सांगण्याची जरूरी नाहीं.

**दुधाच्या उत्पादनवाढीस मदतः**—भारतांतील दुधाचें उत्पन्न वाढविण्याकरितां 'जागतिक अन्न व शेती-संघटना' या संस्थेकडून सुमारें ५८ लक्ष रुपयांची मदत मिळालेली आहे असें 'महाराष्ट्र टाईम्स' या वर्तमानपत्राच्या १८-१-६४ च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे.

या मदतींतून अमेरिकन मका व सॉरधम (ज्वारीची जात) हीं जनावरांच्या खुराकाकरितां मिळणार असून दुधाचें उत्पादन वाढविण्याची ही योजना सरकारतर्फे आनंद (गुजरात) येथील खेडा डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह मिल्क प्रोड्यूसर्स यूनियन (दूध उत्पन्न करणारी संघटित संस्था) या संस्थेमार्फत अमलांत येणार आहे. या योजनेचा हेतु जनावरांना समतोल खुराक घालून प्रत्येक जनावराचें दुधाचें उत्पादन वाढवावयाचें आणि त्याबरोबरच उत्पादनाचा खर्च कमी करावयाचा असा आहे असेंहि प्रसिद्ध झालें आहे.

---

**सालरजंग संग्रहालयाला देणगी**—हैदराबाद येथील सालरजंग संग्रहालय ऐतिहासिक वस्तूंच्या मूल्यवान् संग्रहासाठी प्रसिद्ध आहे. ह्या संग्रहालयांत दुर्मीळ वस्तु असाव्यात अशी आस्था पं. नेहरूंनीं व्यक्त केली होती. संग्रहालय खाजगी स्वरूपाचें असलें तरी १९५२ सालीं पं. नेहरूंच्या हस्तें तें सार्वजनिक करण्यांत आलें आहे. त्यांनीं स्वतःला भेट म्हणून मिळालेलें एक हिरेजडित घड्याळ संग्रहालयाला भेट म्हणून दिलेलें आहे.

**गुजरात राज्यांत कॅन्सरसंबंधीं इस्पितळ**—अहमदाबाद शहरांतील एक प्रमुख उद्योगपति श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांनीं गुजरात राज्यांत कॅन्सर सोसायटी स्थापन करण्यासाठी १ लाख रुपयांची देणगी दिली आहे. सोसायटीनें कॅन्सरच्या रोग्यांवर उपचार करण्यासाठी एक आधुनिक इस्पितळ स्थापन करण्याचें ठरविलें आहे. इस्पितळांत सर्व आधुनिक साहित्य असेल. इमारतीच्या बांधकामास प्रारंभ करण्यांत आला आहे.

**स्कूटर्सचा नवा कारखाना**—पूर्व भारतांत हाल्दिआ ह्या ठिकाणीं स्कूटर्स तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठी परवाना देण्यांत यावा अशी विनंति बंगाल सरकारनें भारत सरकारच्या भारी उद्योगधंद्याच्या खात्याकडे केली आहे. हा कारखाना काढण्यांत आल्यास पूर्व बंगालमधून आलेल्या शेतकऱ्याव्यतिरिक्त इतर निर्वासितांना रोजगार देतां येईल आणि ह्या भागांतील स्कूटर्सची तुंबलेली मागणीहि पुरवतां येईल असें बंगाल सरकारचें म्हणणें आहे.

## सायबेरिआची औद्योगिक वाटचाल

रशिआंतील सायबेरिआ हा भूभाग गेल्या कांहीं वर्षांत औद्योगिक दृष्ट्या प्रगत होत चाललेला आहे. कम्युनिस्ट क्रांतीपूर्वी राजकीय कैद्यांना हद्दपार करण्यासाठीच त्याचा उपयोग होत असे. तथापि, ह्या भागांत तेलाचे व नैसर्गिक वायूचे भूमिगत साठे मोठ्या प्रमाणावर आहेत असा भूस्तर शास्त्रज्ञांचा अंदाज होता. गेल्या पांच वर्षांत रशियानें तेलाच्या शोधाचें काम जारीनें चालूं केलें आणि त्याला आतां फळें येऊं लागलीं आहेत. पश्चिम सायबेरिआंतील बरेंच अशुद्ध तेल आतां तेलशुद्धीच्या कारखान्यांकडे रवाना होऊं लागलें आहे. दुसऱ्या महायुद्धांत रशिआवर जर्मनीचा हल्ला झाल्यावर पश्चिम रशिआंतील बरेच उद्योगधंदे उध्वस्त झाले. तेव्हांपासूनच सायबेरिआंत दुसरा औद्योगिक तळ उभारण्याची कल्पना मूळ धरूं लागली होती. परंतु त्या वेळीं सायबेरिआंत लोकसंख्या बेताची होती आणि वाहतुकीचीं साधनें तर नव्हतींच. अलीकडे रशिआंत अन्नधान्याचा तुटवडा पडूं लागल्यापासून सायबेरिआंतील पडिक जमीन लागवडीस आणण्यास हेतुपुरस्सर प्रारंभ झाला. ह्या सर्व घडामोडींमुळें तेथील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग आतां होऊं लागला आहे. पण सायबेरिआच्या विकासाला केवळ आर्थिकच महत्त्व आहे असें नाहीं. हा भूभाग चीनला जवळ आहे. तेथील लोकवस्ती अजूनहि विरळ आहे. त्यामुळें आपल्या प्रचंड लोकसंख्येची समस्या सोडविण्यासाठी चिनी राज्यकर्ते त्यावर नजर ठेवण्याची शक्यता आहे. रशिया व चीन ह्यांच्यामध्यें सध्यां चालू असलेल्या वादामुळें हा भाग औद्योगिक दृष्ट्या प्रगत करणें महत्त्वाचें आहे, ह्याचीहि जाणीव रशिआला आहे.

---

## वाफेच्या इंजिनांची निर्मिति बंद

चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत वाफेवर चालणाऱ्या रेल्वे इंजिनांचें उत्पादन बंद करण्याचा निर्णय रेल्वेबोर्डानें घेतला आहे. भारतामधील रेल्वेवाहतुकीचा व्याप वाढत चाललेला असून वाढती वाहतूक कार्यक्षमतेनें करण्यासाठी विजेवर चालणाऱ्या गाड्यांची व डिझेल-विजेवर चालणाऱ्या गाड्यांची आवश्यकता भासणार आहे. पुष्कळशा देशांतून वाफेवर चालणाऱ्या रेलगाड्यांची जागा डिझेल-वीज इंजिनांनीं ओढल्या जाणाऱ्या गाड्यांनीं घेतलेली आहे. शिवाय ह्या देशांतील अनुभवाप्रमाणें त्यामुळें रेल्वेची आर्थिक परिस्थितीहि सुधारली आहे. वाफेच्या रेल्वे इंजिनांची निर्मिति बंद करण्याचा निर्णय अमलांत आणला गेल्यानंतर चित्तरंजन येथील इंजिनांच्या कारखान्यांत विजेचीं इंजिनें तयार होऊं लागतील. तथापि कारखान्यांत तयार करण्यांत येत असलेलीं वाफेचीं इंजिनें आणखी ४० वर्षें धावतच राहतील.

---

## सार्वजनिक मालकीचा कागदाचा कारखाना

कागद तयार करण्याचा सार्वजनिक मालकीचा एक कारखाना चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत स्थापन करण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. कागदाच्या उद्योगधंद्यांत खाजगी भांडवल येत नाहीं; कारण, त्यांत नफ्याची कूस बेताची आहे. म्हणून सार्वजनिक मालकीच्या विभागांत असा कारखाना काढण्याची कल्पना पुढें आली आहे. कारखाना काढण्यांत आला तर त्यासाठी कच्चा माल म्हणून उसाचीं चिपाडें वापरण्यांत येण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेश आणि बिहार राज्यांतील साखरेच्या कारखान्यांत आधुनिक यंत्रसामग्री बसविण्यांत येणार आहे. त्यामुळें उसाचीं चिपाडें भरपूर प्रमाणांत उपलब्ध होतील.

## दुग्धदायितेंत वाढ

( श्री. वा. कृ. कोगेकर, एल. एजी. )

भारताच्या वाढत्या लोकसंख्येला सकस खाद्य या दृष्टीनें दुधाचा पुरवठा होण्याकरितां लोकसंख्येच्या वाढीबरोबरच दुभत्या जनावरांपासून मिळणाऱ्या दुधाचें प्रमाणहि वाढविण्याचे उपाय योजण्याची जरूरी आहे. या बाबतींत दुमत नाहीं.

**सध्यां दर माणशीं मिळत असलेलें दुधाचें प्रमाण :—** इतर देशांशीं तुलना केली असतां भारतांत सर्वसाधारण मानानें प्रत्येक व्यक्तीच्या वांट्यास येणारें दुधाचें प्रमाण फारच कमी असल्याचें दिसून येतें.

| देश | औंस |
|---|---|
| भारत | ४·२० |
| इंग्लंड | १९·५० |
| अमेरिका | २२·५० |

वरील प्रमाणावरून आपल्या देशास दुधाचा पुरवठा जास्त कसा होऊं शकेल या बाबतींत प्रयत्न झाले पाहिजेत.

### दूधउत्पादन व त्याच्या वाढीचे प्रयत्न

दुधाचे उत्पादनांत वाढ होण्याकरितां मुख्यत: ३ गोष्टींचा संबंध येतो.

( १ ) दुभत्या जनावरांतील ' अनुवंशिक ' गुण.

( २ ) जनावरास मिळणारें खाद्य ( खुराक )

( ३ ) जनावरास मिळणारा चारा, वैरण, वगैरे.

वरील बाबतींत झालेल्या प्रयत्नांकडे लक्ष देणें जरूर आहे.

**( १ ) अनुवंशिक गुण:—** या बाबतींत बरींच भिन्न मतें दिसून येतात. कांहीं पशुतज्ज्ञांचें मत असें आहे कीं, परदेशांतून जास्त दूध देणाऱ्या जातीचे वळू आणून त्यांचा येथील गाईंशीं संकर करावा; त्यापासून झालेल्या उत्पत्तींत जास्त दूध देण्याचे गुण येतील. कांहींचें मत असें आहे कीं, वरीलप्रमाणें परदेशांतून आणलेल्या वळूस इकडील हवा-पाणी मानवत नाहीं व त्यांचें खाणेंहि वेगळें असल्यानें ते येथें टिकाव धरून राहणें कठीण होतें. यदाकदाचित् ते टिकून राहिल्यास त्यापासून झालेल्या पहिल्या-पिढीच्या संततींत जास्त दूध देण्याचा कांहीं गुण येऊ शकतो व याकरितां चार वर्षें मात्र थांबावें लागतें. परंतु पुढील पिढ्यांत हा जास्त दूध देण्याचा गुण टिकून राहिलच अशी खात्री नसते.

**पशुतज्ज्ञांचें मत :—** वरील बाबतींत मेजर वा. वि. सोमण या अनुभवी पशुतज्ज्ञाचें मत असें आहे कीं, परदेशांतून वळू न आणतां आपल्या देशांतील निरनिराळ्या गाईंच्या जातींमधून योग्य वळूंची निवड करून त्यांची व्यवस्थित जोपासना केल्यानें आपल्याकडील जनावरें दुग्धदायितेच्या बाबतींत सुधारणें अशक्य नाहीं.

मेजर सोमण म्हणतात, कीं परदेशी वळू आणून त्याबद्दलचे प्रयोग मिलिटरी डेअरीमध्यें बरींच वर्षें चाललेले आहेत. त्यावरून पाहतां संकर करून निम-विलायती गाय दूध देण्याचे बाबतींत बरी निघते, हें मान्य. परंतु तिची पुढील पिढी तितकी उपयुक्त ठरेलच, असें नाहीं.

मेजर सोमण म्हणतात, इंग्लंमधील जास्त दूध देणारी गाईची जात म्हणजे ' आयर शायर '. या गाईंच्या जातीचा इतिहास पाहिल्यास अगदीं गावरांनीं गाईंतून सुधारून ही जात जगप्रसिद्ध झालेली आहे. हें निव्वळ सतत प्रयत्नांचें फळ आहे. असें आपणांस का करतां येऊं नये ?

पंजाबमधील ' हिसार ' व ' साहीवाल ', तसेंच काठेवाडांतील ' गीर ' गाई या आजहि दूध कमी देण्याच्या बाबतींत कमी लेखता येणार नाहींत. प्रत्येक प्रांतांत देखील जास्त दूध देणाऱ्या गाई आढळतात. त्यांचा अभ्यास करून ती जात सुधारण्याचा प्रयत्न केल्यास यश येण्यास फारसें कठीण पडणार नाहीं. प्रत्येक जातींत कांहीं पोटजातीहि आढळतात; त्यांची बारकाईनें तपासणी करून हें काम हातीं घेणें हितावह होईल.

**वळूची निवड :—** उत्पत्तिशास्त्राच्या प्रगतींत झालेल्या नियमाप्रमाणें आपण जो वळू गाईकरतां उपयोगांत आणतों त्याच्या मध्यें आईचे अगर बापाचे अनुवंशिक गुण कोणते आलेले आहेत हें त्याच्यामधील आईबापांच्या रक्ताचें साम्य पाहून सांगतां येतें. म्हणजे दुधाळ जनावराचे वळूंत त्याच्या आईचा दूध देण्याचा गुणधर्म आला असेल तर तोच वळू दुग्धदायितेच्या वाढीकरितां वापरणें फायदेशीर होईल. नुसता धष्टपुष्ट वळू पाहून कांहीं उपयोग नाहीं.

वरील हकिकतीवरून परदेशी जनावरें आणून येथील जनावरांची सुधारणा करणें फारसें इष्ट होणार नाहीं व परदेशांतून जनावरें आणण्यामध्यें खर्च अनाठायीं करण्याऐवजीं आपल्याकडे असलेल्या जनावरांची निवड करून त्यांची खाण्यापिण्याची वगैरे योग्य जोपासना करण्यास खर्च करणें योग्य होईल. जनावरांच्या योग्य जोपासनेची आवश्यकता शेतकऱ्यांना पटवून दिल्यास दुग्धदायितेच्या वाढीच्या बाबतींत लवकर प्रगति होऊन ती देशाच्या दृष्टीनें हितावह ठरेल. ( मेजर वा. वि. सोमण यांचा वरीलसंबंधीं लेख ' पशुधनाची निपज सुधारण्याचा प्रश्न ' 'महाराष्ट्र टाईम्स 'च्या १५-१-६४ च्या अंकांत आलेला आहे. )

**(२) दुभत्या जनावराचा खुराक:—** दुभत्या जनावरास द्यावयाचा खुराक हाहि दुग्धदायितेच्या वाढीच्या बाबतींतील महत्त्वाचा प्रश्न आहे. दुभत्या जनावरास कांहीं सकस खाद्य दिल्याशिवाय दुधाचा प्रवाह पाहिजे तसा चालू राहात नाहीं. खुराकामुळें जनावरास पौष्टिक खाद्य मिळून त्याचा परिणाम दुधाच्या प्रतीवरहि होतो. दुग्धदायिता टिकून राहण्यास योग्य खुराकाची जरूरी असते. सर्वसाधारणपणें खुराकाच्या पदार्थांत सरकी, पेंड, कोंडा किंवा भुस्सा, चुणी, यांचा समावेश होतो. वरील खुराकांत थोडेसें मीठ टाकण्यास विसरू नये. मिठामुळें जनावराच्या पचनक्रियेस मदत होते. सर्वसाधारणपणे प्रत्येक दोन पौंड दुधास १ पौंड वरील खुराकाचें मिश्रण, असें प्रमाण असावें. अर्थात् यात हवामान वगैरे संबंधांत फरक करण्यात येत जावा. वरील प्रमाणें खुराकाचा दुग्धदायितेवर कसा परिणाम होतो हे अनुभवानें समजून येईल.

**( ३ ) चराऊ रान व चारा —** दुग्धदायितेवर परिणाम करणारें तिसरें महत्त्वाचें साधन म्हणजे जनावरांसाठी भरपूर चराऊ रान व त्यांतून मिळणारें सकस गवत हें होय. या बाबतींत पाश्चात्य देशांत फारच काळजी घेण्यांत येते.

**पाश्चात्य देशांतील चराऊ रानाची व्यवस्था :—** पाश्चात्य देशांमध्यें चराऊ रानाचे वेगवेगळे भाग पाडून कांहीं भाग फक्त चारणीकरतां राखून ठेवतात. त्यामुळें जनावरांस मनमुराद चरता येऊन चांगल्या सकस गवताचा चाराहि विपुल मिळूं शकतो. या चराऊ रानांत चांगल्या जातीची सकस गवतेंच फक्त राखलीं जातात. कुसळी गवत, कांटेरी झुडपें, काढून टाकतात. आपल्याकडेहि गवती रानामध्यें मारवेल, पवन्या, वगैरेसारखीं सकस गवतें उगवूं देण्याचा प्रयत्न केल्यास जनावरांस चांगलें चरावयास मिळून खाण्याचा चाराहि चांगला मिळू शकेल. चराऊ रानांत, जनावरांस हिंडण्याफिरण्यामुळें मोकळी हवा, ऊन, वगैरे मिळून त्यांची प्रकृति चांगली राहून त्याचा परिणाम दुग्धदायितेवरहि होतो. चराऊ रान व गवत-कापणीकरता राखलेलें रान

### सोन्याचें जागतिक उत्पादन

सोन्याचें जागतिक उत्पादन १९६३ मध्यें ४.५% नें वाढून ३.९२ कोटी फाइन औंस झालें. ( त्यांत रशियांतील उत्पादनाचा समावेश नाहीं. ) एकूण उत्पादनापैकी ७०% उत्पादन एकट्या दक्षिण आफ्रिकेंत झालें. १९६२ चे मानानें १९६३ सालीं दक्षिण आफ्रिकेनें ७.६% जास्त उत्पादन केलें. घानामधील उत्पादन ८.८ लक्ष फाइन औंसांचें ९.२ लक्ष फाइन औंसांवर गेलें. बाकीच्या सर्व देशांतील उत्पादनानें घट दाखविली. भारतांतील उत्पादन १९६२ चे मानानें १९६३ सालीं १.८% कमी होऊन तें १.६० फाइन लक्ष औंस भरलें.

उत्पादनाचे तुलनात्मक आकडे
( हजार फाइन औंस )

| | १९५९ | १९६२ | १९६३ |
|---|---|---|---|
| दक्षिण आफ्रिका | २०,०६६ | २५,४९२ | २७,४३२ |
| कॅनडा | ४,४८३ | ४,१५८ | ४,००० |
| अमेरिका | १,६३५ | १,५५६ | १,५०० |
| ऑस्ट्रेलिया | १,०८५ | १,०७३ | १,०२० |
| घाना | ९१३ | ८८८ | ९२० |
| द. ऱ्होडेशिया | ५६७ | ५५५ | ५५० |
| फिलिपाइन्स | ४०३ | ४२४ | २८० |
| कोलंबिया | ३९८ | ३९७ | ३५० |
| जपान | ३२८ | ४२० | ४०० |
| मेक्सिको | ३१४ | २३४ | २३० |
| निकाराग्वे | २१८ | १५४ | २०० |
| ब्राझिल | १८० | १८० | १८० |
| भारत | १६५ | १६३ | १६० |
| पेरू | १५० | १२५ | १२० |
| चिली | ७९ | १०० | १०० |
| टांगानिका | ९७ | १०२ | १०० |
| स्वीडन | १०३ | १०० | १०० |
| इक्वेडर | १,६१६ | १,३७९ | १,५५८ |
| जागतिक उत्पादन ( रशिया वगळून ) | ३२,८०० | ३७,५०० | ३९,२०० |
| द. आफ्रिकेनें प्रमाण % | ६१.२ | ६८.० | ७०.० |

### रिझर्व्ह बँकेचा विस्तार

औद्योगिक पतपुरवठ्याच्या दृष्टीनें १ जुलै, १९६४ हा दिवस महत्त्वाचा ठरणार आहे; त्या दिवशीं रिझर्व्ह बँकेच्या मालकीची सबसिडिअरी म्हणून इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट बँक अस्तित्वांत येईल; त्याच दिवशीं युनिट ट्रस्ट आपली युनिट्स जनतेला विकण्यास प्रारंभ करील. रिफिनॅन्स कॉर्पोरेशनचें काम बँक स्वतःकडे घेईल; नंतर नॅशनल इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची पाळी येईल. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनला पुढेंमागें सबसिडिअरी केलें जाईल. रिझर्व्ह बँकेचीं कामें अशा रीतीनें वाढत जाणार आहेत. देशाची मध्यवर्ती बँक म्हणून तिची नेहमींचीं कामें आहेतच; शेतीच्या पतपुरवठ्याची ती केंद्रीय संस्था झालेली आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाची बहुतांश मालकी रिझर्व्ह बँकेकडेच आहे; त्यामागें व्यापारी बँकिंगचा मोठा भाग तिच्या हातीं आहे. रिझर्व्ह बँकेचा कारभार दिसायला स्वतंत्र असला, तरी नवी दिल्लीचें नियंत्रण फारसें दूर नाहीं. रिझर्व्ह बँकेला एका प्रचंड होल्डिंग कॉर्पोरेशनचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें आहे.





बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व पाळ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले
" विजय " नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग


तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

## दि कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., गौतम नगर.

( पोस्ट कोळपेवाडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर. )

**सरकारच्या भांडवलाची आणि इं. फि. कॉर्पोरेशनच्या कर्जाची मुदतीआधींच परतफेड.**

या कारखान्याचे भागभांडवलामध्यें रुपये दहा लाख महाराष्ट्र सरकारनें १९५५ मध्यें जमा केले होते व या रकमेची फेड १५ वर्षांचे मुदतींत करण्याचें ठरलें होते. या कारखान्यानें दि. १७-६-१९६४ रोजीं म्हणजे पंधरा वर्षांचें ऐवजीं नऊ वर्षांतच महाराष्ट्र सरकारचें भागभांडवल परत केलें आहे. याशिवाय कारखाना उभारणीसाठी दि इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, न्यू दिल्ली या संस्थेकडून या कारखान्यानें जें चाळीस लाखांचें कर्ज १९५५ सालांत घेतलें होतें त्याची फेड बारा वर्षांत करण्याची होती; परंतु सदरहू कर्जाची संपूर्ण फेड ३१ जुलै, १९६३ रोजीं, म्हणजे आठ वर्षांतच, या कारखान्यानें केली आहे.

वरीलप्रमाणें बाहेरून उभारलेल्या संपूर्ण भांडवलाची परतफेड करून सहकारी साखर कारखान्याच्या निर्मितीमध्यें, ते संपूर्णपणें शेतकऱ्याच्या मालकीचे व्हावेत व त्यांचेकडूनच चालविले जावेत असें जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें, तें या कारखान्याकडून अल्पावधींतच फलद्रूप झालें आहे.

### सरटॅक्स रद्द होण्याची शक्यता

भारतामधील उद्योगधंद्यांच्या नफ्यावर सध्यां जबर दरानें सरटॅक्स वसूल करण्यांत येतो. हिंदी कंपनी कायद्याच्या एका खास अमेरिकन अभ्यासकानें असें मत व्यक्त केलें आहे कीं चीननें भारतावर आक्रमण केल्यामुळें हा कर बसवावा लागला. चीनच्या आक्रमणाची भीति नष्ट झाल्यास येत्या तीन वर्षांच्या कालांत हा कर रद्द होण्याची शक्यता ह्या अभ्यासकानें व्यक्त केली आहे. भारतानें आपल्या संरक्षणासाठीं लागणारा जादा खर्च तुटीच्या अंदाजपत्रकाच्या साह्यानें न करतां जादा कर बसवून करण्याचें ठरविल्याबद्दल त्यानें प्रशंसा केली आहे. हिंदमधील सुपरटॅक्स आणि सरटॅक्स ह्यांना अमेरिकन भांडवलदारानें बिचकण्याचें कारण नाहीं असेंहि मत त्यानें व्यक्त केलें आहे.

### कापडाच्या निर्यातींत घट

भारताकडून सीलोनला निर्यात करण्यांत येणाऱ्या कापडांत घट होत चालली आहे. १९५९ सालीं भारतानें सीलोनला १·३२ कोटी वार कापड निर्यात केलें होतें. सीलोनच्या कापडाच्या एकूण आयातीशीं १८·१ टक्के असें हें प्रमाण पडतें. १९६० सालीं हेच आंकडे अनुक्रमें १·६२ वार आणि २०·८ टक्के असें होतें. परंतु १९६१ पासून कापडाच्या निर्यातींत घट होत चाललेली आहे. भारताच्या कापडाची जागा जपानचें व चीनचें कापड घेत चाललें आहे.

### महानदीवरील ७,३९२ फुटांचा पूल

भारतांतील मोटरवहातुकीच्या सर्वात लांब (७,३९२ फूट) पुलाचें उद्‌घाटन २८ जून रोजीं करण्यांत आलें. हा पूल महानदीवर कटक येथें बांधण्यांत आला आहे. कलकत्ता आणि कटक ह्यांना सांधणाऱ्या रस्त्याचा हा एक महत्त्वाचा दुवा आहे. हा मोठा रस्ता ३८ फूट रुंदीचा असून ओरिसांतील सहा मोठीं शहरें आणि १,००० खेडेगांवें ह्यांतून तो जाईल. सुमारें २०,००० कामगार ह्या रस्त्याचें बांधकाम करीत आहेत.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः—युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

सेव्हिंग्ज् बँक:—२ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष—४¼ टक्के, २ वर्षें—४½ टक्के, ३ वर्षें—४¾ टक्के, ४ वर्षें—५ टक्के, ५ वर्षें—५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा—विस्तार

शाखा—१. मुंबई—फोर्ट, २. मुंबई—गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर—मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

दि. ३१—१२—१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी चेअरमन.

## दि सांगली बँक लि.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० चे वर |
| रिझर्व्ह फंडस् | रु. १०,००,००० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ४ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत मिळून एकूण २३ शाखा

★ आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारचे बँकिंगचे अद्ययावत् व्यवहार योग्य तऱ्हेनें केले जातात.

★ हेड ऑफिस सांगली व इचलकरंजी, रविवार पेठ-पुणें आणि बेळगांव या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्सची सोय करण्यांत आली आहे.

अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखाधिकाऱ्यास अवश्य भेटा.

रजिस्टर्ड ऑफिस राजवाडा चौक सांगली.

एम्. के. गुने M. A., LL. B., C. A. I. I. B. मॅनेजर.

## आईल इंडिआ कंपनीची प्रगति

ऑइल इंडिआ कंपनीच्या १९६३ सालाच्या अहवालावरून तिनें केलेल्या प्रगतीची कल्पना येते. कंपनीनें कर वजा जातां ९ टक्के नफ्याची वांटणी केलेली आहे. आसाममधील अशुद्ध तेलाच्या साठ्यांचा शोध करून तें शुद्ध करण्यासाठी कंपनीतर्फे गोहाटी आणि बरौनी येथील तेलशुद्धीच्या सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांकडे पाठविलें जातें. ह्या दोन्ही कारखान्यांना जितक्या अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्याचें कंपनीनें आश्वासन दिलें होतें तितकें तेल पुरविण्यांत तिला यश आलेलें आहे. भारतांत खनिज तेलाची मागणी वाढत चाललेली आहे. ऑइल इंडिआ कंपनी देशांतर्गत तेलाची मागणी भागविण्याचा जोराचा प्रयत्न करीत आहे. हिंदमधील खनिज तेलाची मागणी भागविण्यासाठी परदेशांतूनहि तेलाची आयात करण्यांत येते. परंतु ह्या कामीं परदेशीय चलनाच्या टंचाईचा प्रश्न उभा राहतो. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतांत ६० लाख टन अशुद्ध तेलाचें उत्पादन होऊं लागेल आणि त्यांपैकीं निम्म्यापेक्षा अधिक उत्पादन आसाममधील तेलाच्या विहिरींपासून होईल असा अंदाज आहे. हा अंदाज खरा ठरला तर दरसाल सुमारें ४० लाख रुपये किंमतीच्या परदेशीय चलनाची बचत होऊं लागेल. कंपनीतर्फे आसाममध्यें नव्या विहिरी खोदण्याचें काम चालूं आहे. त्या कामीं बऱ्याच अडचणी आल्या असल्या तरी ठरल्याप्रमाणें उद्दिष्ट गांठण्यांत आलेलें आहे. तेलासाठी आधुनिक उपकरणांनीं शोध करण्यांत येत असून ह्या कामांतहि उद्दिष्टापेक्षा अधिक काम झालेलें आहे. नेफा भागांत प्रवेश मिळविण्याचे परवाने वेळेवर मिळाले असते तर काम आणखीहि झपाट्यानें होऊं शकलें असतें.

## भिलई येथें सिमेंटचा कारखाना

मध्यप्रदेशांतील भिलई येथें सिमेंट तयार करण्याचा एक कारखाना लवकरच उभारण्यांत येणार आहे. त्याच्या उभारणीसाठी ५ कोटी रुपये खर्च येईल. भिलईच्या आसपास साह्यक उद्योगधंदे उभारतां यावे म्हणून औद्योगिक वसाहत उभारण्यांत यावयाची आहे. वसाहतीसाठी १० हजार एकर जमिनीची सुधारणा करण्यांत येत आहे. औद्योगिक वसाहतींत निघूं शकणाऱ्या उद्योगधंद्यांना पाण्याचा पुरवठा करतां यावा म्हणून एक योजना आखण्यांत आली आहे. योजनेमुळें दररोज १५ लाख गॅलन पाणी पुरवता येईल. भिलई येथील पोलाद कारखाना आणि त्याच्या आसमंतांतील परिसर हा कांहीं वर्षांत उद्योगधंद्यांच्या उभारणीमुळें गजबजून जाईल असें दिसतें.

## पलाई बँक डायरेक्टराची कोर्टांत उघड तपासणी

श्री. जॉर्ज टॉमस कोट्टकपली, पलाई सेंट्रल बँकेचे (आतां लिक्विडेशनमध्यें) डायरेक्टर, ह्यांची बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ४५ (जी) कलमाखाली 'पब्लिक एक्झॅमिनेशन' करण्यांत यावी, असा केरळ हायकोर्टानें हुकूम दिला आहे. त्याप्रमाणें श्री. कोट्टकपली ह्यांची कोर्टामध्यें २० जुलै रोजीं तपासणी होईल.

## नापासांतून यशस्वींच्या पहिल्या क्रमांकांत

मराठवाडा विद्यापीठाच्या बी. ए. च्या परीक्षेस बसलेल्या एका विद्यार्थिनीच्या पालकांनीं तिचे पेपर्स पुन: तपासून पाहण्याची मागणी केली, तेव्हां चूक दुरुस्त करण्यांत येऊन ती पहिली आली असल्याचें रजिस्ट्रारनें प्रेसनोट काढून जाहीर केलें आहे.


श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०

२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००

सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.


— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार-सरदार ह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




किर्लोस्कर

शेंगा यंत्रें

- कॉटेज हॅण्ड शेंगायंत्र
- कॉटेज हॅण्ड व पॉवर शेंगायंत्र
- कल्याण पॉवर शेंगायंत्र

घरगुती उपायोगासाठी, व्यापारासाठी, तेलगिरण्यांसाठी अशा विविध उपयोगासाठी लागणारीं लहानमोठीं शेंगायंत्रें तयार करून किर्लोस्कर कारखान्यानें असंख्य गृहिणी, व्यापारी व तेलगिरण्यांचे कारखानदार यांना कामाचा जलद उरक, सर्वांत बचत व मालाचा जलद उठाव असा तिहेरी फायदा गेलीं अनेक वर्षें मिळवून दिला आहे.

सविस्तर माहितीसाठी लिहा

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, किर्लोस्करवाडी, जि. सांगली

SHUSA KM 16/63

## लहान उद्योगधंद्यांना भांडवल पुरवठा
### सारस्वत को. बँकेच्या संचालकांची व्यापारी-कारखानदारांबरोबर उद्बोधक चर्चा
### श्री. वर्दे ह्यांचें मार्गदर्शन

लहान व्यापारी आणि उद्योगधंदेवाल्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्या दूर करण्याचा काय प्रयत्न करतां येईल, ह्याची चर्चा करण्याकरितां सारस्वत को. बँक लि. नें एक अनौपचारिक सभा २१ जून रोजीं आयोजित केली होती. त्या-वेळीं भाषण करतांना बँकेचे चेअरमन, श्री. व्ही. पी. वर्दे, ह्यांनीं पब्लिक आणि प्रायव्हेट क्षेत्रामध्यें लहान उद्योगधंद्यांच्या विकासा-साठीं कोणकोणत्या मार्गें आर्थिक साहाय्य दिलें जातें, त्याचा प्रथम आढावा घेतला, आणि नंतर सारस्वत बँक करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती सांगितली. सहकारी क्षेत्रामध्यें काम करणाऱ्या अर्बन बँकांत ही बँक अग्रेसर आहे, हें सुप्रसिद्धच आहे. मुख्यत: उत्पादक व्यवसायांना बँक कशी सढळ हातानें मदत करते, हें श्री. वर्दे ह्यांनीं आकडेवार माहिती देऊन विशद केलें.

### दीर्घ मुदतीचें भांडवल

(१) जमीन, इमारती, यंत्रसामग्री, इत्यादींसाठीं आणि (२) चालू भांडवलासाठीं, अशा दोन प्रकारची मुख्यत: आर्थिक मदत लागते. पहिल्या प्रकारच्या कर्जाच्या परत फेडीचा मुदत ५–७ वर्षें किंवा १०–१५ वर्षें अशी असावी लागते. अशीं कर्जें सामान्यत: अर्बन बँकेच्या कक्षेंत येत नाहींत; परंतु दीर्घ मुदतीचीं कर्जें देणाऱ्या संस्था तशी मदत करणार असल्याची बँकेची खात्री पटली तर तीं कर्जें प्रत्यक्ष हातीं येईपर्यंतच्या काळासाठीं ही बँक तात्पुरतीं कर्जें देते. परतफेड ५–७ वर्षांत होणार असेल, तर ही बँक स्वत:च्या फंडूसमधून देतां येण्याजोग्या कर्जाचा विचार करूं शकते.

### खेळतें भांडवल

(१) कच्चा माल, (२) चालू उत्पादन, (३) पक्का माल आणि (४) व्यापारी येणीं, त्याचप्रमाणें मजुरी, पगार, इतर खर्च ह्यांसाठीं खेळतें भांडवल लागतें. ह्या गरजा सततच्या असतात आणि त्याप्रमाणें बँकांच्या कर्जाचा ओघहि सतत चालू रहावा लागतो. कारखान्याची वाढ होत जाते तसतशी खेळत्या भांडवलाची गरजहि वाढत जाते. प्रत्येक बाबतींत योग्य तें मार्जिन राखून, बँक ह्या सर्व गरजा पुरवण्यास तत्पर असते. कर्जाच्या अर्जाची छाननी करतांना बँक उद्योगधंद्यांच्या कार्यक्षमतेचा, त्यांतील तंत्रज्ञांच्या पात्रतेचा, विक्रीच्या व्यवस्थेचा, व्यवस्थापकीय पात्रतेचा आणि आर्थिक परिस्थितीचा विचार करते. अर्जदाराची गरज लक्षांत घेतांना बँकेचा दृष्टिकोन व्यावहारिक आणि लवचिक असा असतो.

बँकेनें ज्या उद्योगधंद्यांना अशा रीतीनें भांडवल पुरविलें आहे, त्यांचा विचार केला तर नवे नवे लायक तरुण औद्योगिक क्षेत्रांत पुढें येत आहेत; व्यापारी फर्ममध्यें किंवा सरकारी नोकरी-पेक्षा स्वतंत्र उद्योगधंदा करण्यास प्राधान्य देत आहेत, असें दिसून येतें; ही गोष्ट अत्यंत स्वागतार्ह आहे.

वरीलप्रमाणें भाषण करून श्री. वर्दे ह्यांनीं उपस्थितांना मोकळे-पणानें आपल्या अडीअडचणी मांडण्याचें आवाहन केलें. त्यांचा विचार करून बँकेला आपली उपयुक्तता वाढविण्याचे नवे मार्ग सांपडूं शकतील, असेंहि त्यांनीं सांगितलें. "देशाचें झपाट्यानें औद्योगीकरण होऊन, त्यांतील रोजगार वाढून, दारिद्र्य नष्ट होण्याची आजची तातडीची गरज आहे; त्यासाठीं तरुण लोकांनीं पुढें आलें पाहिजे" असा त्यांनीं आपल्या भाषणाचा समारोप केला.

### सभेंतील उद्बोधक चर्चा

सहकारी खात्याचे, औद्योगिक खात्याचे, रिझर्व्ह बँकेचे आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे अधिकारी, त्याच-प्रमाणें व्यापारी आणि कारखानदार सभेस बहुसंख्येनें उपस्थित होते. बुकसेलर्स पब्लिशिंग हाऊसचे मालक श्री. डी. बी. टिळक, साचीन इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनचे श्री. एस. पी. मराठे, फार्मासर्च लॅब्स. चे मालक श्री. आर. एन. कुलकर्णी, रिझर्व्ह बँकेचे अधिकारी श्री. के. जी. पाटकर, किशोर इंडस्ट्रीजचे मालक श्री. एन. एन. देसाई, डेप्युटि डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज श्री. पी. ए. सबनीस, गोरेगांव येथील श्री. आर. एन. राव, डेप्युटि डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज श्री. कसबेकर आणि डिव्हि. जॉ. रजिस्ट्रार श्री. डी. ए. अंबेकर ह्यांनीं सभेंत भाषणें केलीं आणि आपले विचार सांगितले; त्याचप्रमाणें भांडवलपुरवठ्याच्या उपलब्ध सोयींची माहिती दिली.

### बँकेचें सभासदत्व सर्वांना खुलें

आपल्या समारोपाच्या भाषणांत श्री. वर्दे म्हणाले, "१९१८ सालीं २,००० रु. च्या भाग भांडवलानें आणि २,००० रु. च्या ठेवींनीं स्थापण्यांत आलेली ही सारस्वत बँक आतां अग्रेसर सह-कारी अर्बन बँक झाली आहे. १० लक्ष रु. चें तिचें वसूल भांडवल असून १४ लक्ष रु. चे रिझर्व्हज् आहेत आणि ठेवींची रक्कम ४ कोटी रु. चे वर आहे. बँकेच्या व्यवहारक्षेत्रांतील सर्वांना तिचें सभासदत्व आतां खुलें आहे. बँक मोठी झाली असली, तरी तिची लहान असामींच्याबद्दलची सहानुभूति आणि कर्तव्याची जाणीव पूर्वीप्रमाणें कायम आहे. श्री. टिळक ह्यांनीं गॅरंटी फंड निर्माण करण्याची कल्पना सभेपुढें मांडली आणि तिला श्री. मराठे ह्यांनीं पाठिंबा दिला; तशा फंडाची उपयुक्तता मलाहि पटली आहे. १९४३ सालींच बँकेनें उद्योगधंद्यांच्या मदतीसाठीं सिल्व्हर ज्युबिली फंड निर्माण केला आहे.

### हिशेबीपणाची आवश्यकता

"कित्येक लहान उद्योगधंद्यांचें व्यवस्थित पूर्वनियोजन होत नाहीं. वास्तविक उद्योग सुरू करण्यापूर्वीच सर्व गोष्टींचा विचार केलेला प्रॉजेक्ट रिपोर्ट तयार करणें आवश्यक आहे. हिशेब नीट ठेवले जात नाहींत; आलेली रक्कम उत्पन्न आणि दिलेली रक्कम खर्च, असें मानण्यांत येतं. भांडवली बाबी आणि रेव्हिन्यू बाबी वेगळ्या करून योग्य रीतीनें हिशेब हवेत; ह्या गोष्टीकडे मी लक्ष वेधूं इच्छितों. सभेंत मांडण्यांत आलेल्या सर्व प्रश्नांचा व्यवस्थापक मंडळ काळजीपूर्वक, सहानुभूतें बाळगून विचार करील, जरूर ते नियम बदलण्यांत येतील, कायद्यांत दुरुस्ती आवश्यक असेल तर सहकारी खात्याला त्याप्रमाणें सांगण्यांत येईल. मी सर्व उपस्थितांचें त्यांच्या कळ-कळीबद्दल आभार मानतों."

सभेनंतर चहापार्टीचा कार्यक्रम झाला.

---

### भारताचा प्रवास : ब्रुकबाँड कंपनीचीं बक्षिसें

ब्रुक बाँड कंपनी लिमिटेडनें आयोजित केलेल्या चित्रकला, निबंध व हस्ताक्षर स्पर्धांत प्राविण्य दाखविल्याबद्दलचें पारितोषिक म्हणून चार ब्रिटिश शालेय विद्यार्थी कंपनीतर्फें भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. हीं मुलें ऑगस्टमध्यें भारतांत येतील व त्यांचा सोळा दिवस येथें मुक्काम राहील. दरवर्षीं होणाऱ्या या स्पर्धांत यंदा दहा हजार शाळांतील ८०,००० विद्यार्थ्यांनीं भाग घेतला होता. हीं मुलें अठरा ऑगस्टला लंडन विमानतळ सोडतील. त्यांचा मुंबईत दोन दिवस मुक्काम राहील. त्यानंतर तीं देशांतील विविध ठिकाणांना भेटी देतील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.